**मे. मानस एग्रो इंडस्ट्रीज एण्ड इन्फ्रा स्ट्रकचर लिमिटेड, युनिट-2, सर्व्हे नं. 165, 168 व 169, गाव – कोलारी, तालुका-चिमूर, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन धान्यावर आधारित 190.0 किलो लिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १७/०६/२०२२ |
| वेळ | : | दुपारी ०१:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ,<br>मे. मानस एग्रो इंडस्ट्रीज एण्ड इन्फ्रा स्ट्रकचर लिमिटेड, युनिट-२, सर्व्हे नं. १६५, १६८ व १६९, गाव कोलारी, तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र |

**प्रस्तावनाः-**

मे. मानस एग्रो इंडस्ट्रीज एण्ड इन्फ्रा स्ट्रकचर लिमिटेड, युनिट-२, सर्व्हे नं. १६५, १६८ व १६९, गाव कोलारी, तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन धान्यावर आधारित १९० किलो लिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातील राज्य स्तरीय तज्ज्ञ मुल्यांकन समिती (SEAC-I) यांना टीओआरसाठी अर्ज सादर केला व त्यास १९२ व्या बैठकीत दिनांक २१/१२/२०२० रोजी आणि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाने त्यास २१४ व्या बैठकीत दिनांक २८/०१/२०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या 10 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ब अनु.क्रं. ५ (जी) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. मानस एग्रो इंडस्ट्रीज एण्ड इन्फ्रा स्ट्रकचर लिमिटेड, युनिट-२, सर्व्हे नं. १६५, १६८ व १६९, गाव कोलारी, तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २५/०३/२०२२ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १७ जून, २०२२ रोजी प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ

इंडिया यात इंग्रजीत दिनांक १४/०५/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई – ४०० ०२२
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर,
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर,
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, चिमूर, तालुका - चिमूर, जिल्हा-चंद्रपूर,
१०) मुख्य अधिकारी, नगर परिषद, चिमूर, तालुका -चिमूर, जिल्हा-चंद्रपूर
११) तहसीलदार, तहसील कार्यालय, चिमूर, जिल्हा-चंद्रपूर
१२) पंचायत समिती कार्यालय, चिमूर, तालुका- चिमूर जिल्हा-चंद्रपूर
१३) ग्रामपंचायत कार्यालय, कोलारी, तालुका- चिमूर, जिल्हा-चंद्रपूर,
१४) ग्रामपंचायत कार्यालय, साठगांव,तालुका- चिमूर ,जिल्हा-चंद्रपूर,
१५) ग्रामपंचायत कार्यालय,चिताळा (कु), तालुका- चिमूर, जिल्हा-चंद्रपूर,
१६) ग्रामपंचायत कार्यालय, मेढेगांव (खापरी), तालुका-पवनी, जिल्हा- भंडारा,
१७) ग्रामपंचायत कार्यालय, कातेपार (ठा.), तालुका-पवनी, जिल्हा-भंडारा
१८) ग्रामपंचायत कार्यालय, भुयार, तालुका-पवनी, जिल्हा- भंडारा,

वरिल अनुक्रमांक ६ ते १८ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३७/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२२०५३०-एफटीएस-०२४८ दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **आयोजक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०४ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्त:-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विशालकुमार मेश्राम, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर

तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी,सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

१) **श्री राजू पुंडलिक अरोरे, सरपंच, कोलारी ग्रामपंचायत, तालुका-चिमूर,जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार हे पहिल्यापासून ऐकतो, पण ती शोकांतिका आहे. कारण प्रकल्पात स्थानिकांना कधिच प्राधान्य देण्यात येत नाही व आलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मानस एग्रोमध्ये युनिट नं. २ मध्ये ८६ व्यक्ती कार्यरत आहेत. त्यातील ७२ कर्मचारी हे भिवापूर, भुयार, कोलारी आणि शंकरपूर या आजूबाजूच्या गावातीलच आहे. म्हणजे प्रकल्पातील 80% रोजगार या परिसरातील गावांनाच मिळत आहे. |
| २) | ग्रेथील स्थानिक प्रदूषणाची आम्ही प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रार केलेली. परिसरातील शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. त्यांच्या पीकाला भाव येत नाही. | |
| ३) | प्रकल्प सुरु करताना सीएसआर निधीतंर्गत स्थानिकांना विविध सुविधा पुरविण्यात येईल असे आश्वासन देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात स्थानिकांना काहीही सुविधा मिळत नाही. प्रदूषण टाळण्यासाठी प्रकल्पाभोवती भिंत बांधण्याची मागणी आम्ही बरेच वर्षे करत आहोत. ती भिंतही बांधलेली नाही. त्यामुळे स्थानिक परिसरातील लोकांच्या डोळ्यांना त्रास झालेला आहे. | कोविड काळात औषधे, मास्क, सॅनिटायझर यांचे वाटप करण्यात आलेले आहे. हे सर्व प्रयोजन नवीन प्रकल्पाच्या अनुषंगाने करणार आहोत. त्याचप्रमाणे वेळोवेळी आरोग्यशिबिरे परिसरातीर गावात आयोजित करण्यात येतील. डोळे तपासणी, चष्मे वाटप असे कार्यक्रम हाती घेण्यात येतील. परिसरातील गावात जेथे टॉयलेट ब्लॉक्सना पाणी पुरवठा नसेल, तेथे पाण्याची सुविधा पुरविण्यात येईल. जेथे पाण्याची सुविधा नाही, तेथे बोअरवेल देण्याचा आमची मानस आहे. |
| ४) | सीएसआर फंड आमच्या गावाला कधिच मिळालेला नाही.प्रकल्पाकडून शैक्षणिक सुविधा, सामाजिक सुविधा, आरोग्य सुविधा कधिच मिळालेल्या नाहीत. तरी स्थानिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावे. माझ्यासारखेच अनेक स्थानिक असतील, | त्यांनी पूढे सांगितले सीएसआर निधीची जी काही गुंतवणूक केली, ती पूर्ण कंपनी/ग्रुप म्हणून म्हणजे सहा युनिटची एकत्रित केलेली आहे. मात्र नवीन प्रकल्पात अंदाजे १४० लाखाची गुंतवणूक करणार आहोत. परिसरातील ग्रामपंचायतींशी आगाऊ चर्चा करुन योजना तयार करण्यात येतील |

| | | |
|---|---|---|
| | त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना मी आणणार आहे. | |

**२) श्री सागर गावंडे, मुक्काम-कोलारी गांव, तालुका-चिमूर,जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नदीचे पाणी खूप खराब येते. त्यात केमिकल असते. त्यामुळे आम्हांला शेतीसाठी त्या पाण्याचा उपयोग होत नही. नदीच्या पाण्यात मासे मेलेले आढळतात. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या कार्यरत प्रकल्पातून सांडपाणी हे बाहेर जात नाही. कारण ऊर्जा प्रकल्पात सांडपाणी निर्मिती होत नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित आसवणी प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण म्हणजे झेलएलडी प्रकल्प आहे. पाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर जाणार नाही. |

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रथम प्रश्न,सूचना,टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रकल्प प्रवर्तक नंतर एकत्रित उत्तरे, खुलासा करतील असे सांगितले.

**३) श्री शरद देवाडे, राहणार-भुयार, तालुका-पोवनी,जिल्हा-भंडारा:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | धान्यावर आधारित १९० केएलपीडीचा आसवणी प्रकल्प उभारणी ही या परिसरातील चांगली बाब आहे. येथे उद्योग नसल्याने स्थानिक युवक,युवतींना पुणे-मुंबई,मराठवाड्यात जावे लागते. बरेच लोक परिस्थिती नसल्याने तिकडे जाऊ शकत नाहीत. हा प्रकल्प स्थानिकांना वरदान आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | मात्र प्रकल्प उभारणीबरोबरच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्याची हमी प्रकल्प व्यवस्थापनाने दिलेली असून पर्यावरणाचे नुकसान न होण्याची काळजी घेण्याचे आश्वासन दिलेले आहे. तरी प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण व्यवस्थापन योजनेची (EMP) अंमलबजापणी कार्यक्षमतेने करावी, जेणेकरुन जनतेच्या आरोग्याचा खेळखंडोबा होणार नाही. परिसरातील मेंढेगाव, काकेपार, | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. सदरहू प्रकल्प हा झेडएलडी आहे. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक. दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा |

| | | |
|---|---|---|
| | भुयार, टेकरी इत्यादी गावांतील लोकांना रोजगाराची संधि मिळेल व कुटुंबाला हातभार लागेल. प्रकल्पास पाठिंबा. | प्रदूषण होत नाही. प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. |

**४) श्री चिंतेश्वर चौधरी, कोलारी गांव, तालुका-चिमूर,जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ह्या प्रकल्पाची उभारणी होणार आहे. त्याचप्रमाणे इतर उद्योगही या परिसरात आलेले आहेत. मात्र स्थानिक प्रश्न आहे की हायवे पासून या कारखान्याकडे येण्यासाठी एकही मोठा रस्ता नाही. एकेरी मोठा रस्ता आहे, तोही जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहे. त्यामुळे १० टनापेक्षा जास्त भार सहन करण्याची शक्ती त्यास नाही. त्यामुळे दरवर्षी तो रस्ता फुटतो. दोन्ही हायवे येथे येत असून, सेलुकरकडून व नऊ नंबरचा हायवे,त्याशिवाय येथे रस्ते विकास झालेला नाही. तरी रस्त्याची व्यवस्था कशी करणार याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. येथे दुहेरी रस्ता 40 टनाचा भार सहन करणारा रस्ता हवा ही विनंती. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की बैठकीत अनेक स्थानिकांनी कार्यरत रस्त्याबाबत सूचना केल्या. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या भावनांचा आम्ही आदर करतो, त्यांचे म्हणणे १००% खरे आहे. मेंढेगावातून होणारी वाहतुक जेवढी कमी करता येईल, तेवढी ती कमी करण्यात येईल. भुयारहून मेंढेगावाच्या आधी एक बाह्यवळणाचे प्रयोजन आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु झालेले असून प्रस्तावित आसवणी प्रकल्प दोन वर्षात पुर्ण होत असताना रस्ताही पूर्ण होईल अशी आम्हांला आशा आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना वाहतुकीमुळे जी अडचण येते, ती राहणार नाही. |

**५) श्री प्रमोद शंभरकर, राहणार-भुयार, तालुका-पवनी,जिल्हा-भंडाराः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा १९० केएलपीडीचा आसवणी प्रकल्प उभारणी होत आहे, ही या परिसरातील चांगली बाब आहे. त्यामुळे येथील बेरोजगारांना रोजगाराची संधि मिळेल. आता प्रदूषणाबाबत चर्चा चालू आहे. तर प्रकल्प प्रवर्तकांनी मप्रनि मंडळानी पारित केलेली मानके (Standards) पाळून प्रकल्प कार्यान्वित ठेवावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.<br>सदरहू प्रकल्प हा झेडएलडी आहे. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी 80 मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. |

**६) श्री दिलीप काटोळे, गाव-भिवापूर, तालुका-भिवापूर,जिल्हा-नागपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पर्यावरणाची काळजी घेऊन प्रकल्प चांगला चालवावा. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सूचनेची नोंद घेण्यात आलेली असून त्याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

**७) श्री सुरेश थेरे,राहणार-मेंढेगांव (खापरी),तालुका-पवनी, जिल्हा-भंडारा:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा प्रस्तावित प्रकल्प चांगला असून भावी पिढीसाठी फायद्याचा आहे. चिमूर, पवनी तालुक्यातील युवक युवतींना या प्रकल्पामुळे रोजगाराची संधि मिळेल. आता पर्यावरणाबाबत चर्चा करताना कंपनीने आपली पर्यावरण संरक्षणाची जबाबदार पाळावी ही सूचना. प्रकल्पास समर्थन. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.<br>त्यांनी पुढे सांगितले की कंपनी पर्यावरण संरक्षणास बांधिल असून सदरहू प्रकल्प हा झेडएलडी आहे. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही. |

**८) श्री धनराज बाभुरडे, राहणार-मेंढेगांव (खापरी), तालुका-पवनी, जिल्हा-भंडारा:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदरहू कारखाना हा शेतीवर आधारित असून कारखान्यामुळे येथील स्थानिक पदवीधर, पदविकाधारक, आयटीआय शिक्षित त्याचप्रमाणे इतर सवंर्गातील स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध होणार आहे. तरी प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना न होण्यासाठी कंपनीने पर्यावरण व्यवस्थापन योजना अंगिकारून प्रदूषण नियंत्रणात ठेवावे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात स्थानीक लोकांना रोजगारासाठी प्राधान्य देण्यात येईल.<br>त्यांनी सांगतिले की पर्यावरण व्यवस्थापन योजना प्रकल्पात राबविण्यात येईल.<br>कंपनी पर्यावरण संरक्षणास बांधिल असून सदरहू प्रकल्प हा झेडएलडी आहे. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक |

| | | |
|---|---|---|
| | | ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही. |

**९) श्री अविनाश बारोकर, राहणार-पाचगाव, तालुका-चिमुर.जिल्हा चंद्रपूर**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चिमूर तालुक्यात उद्योग आलेले नाहीत. या मेंढेगाव, कोलारी परिसरात दहा वर्षापासून या मानस उद्योगामुळे परिसरातील बेरोजगारांना नोक-या मिळाल्या आहेत. प्रस्तावित आसवणी प्रकल्पामुळे स्थानिक २००-२५० लोकांना रोजगार मिळेल. येथे पर्यावरणाची चर्चा होताना प्रकल्प प्रवर्तकांनी ६० मीटरची चिमणी व अद्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविणार आहेत, त्यामुळे हवा प्रदूषणाचा त्रास होणार नाही हे सादरीकरणात दर्शविले आहे. तरी ह्या उद्योगाची येथे गरज आहे असे माझे मत आहे. प्रकल्पास पाठिंबा आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

**१०) श्री एस. चंद्रसेखर, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची योजना पुरविण्यात यावी. सीएसआर निधी हा कंपनी परिसरातील गावांमध्ये खर्च करण्यात यावा. प्रकल्पास पाठिंबा. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

११) श्री मनोहर काटेकर, मुक्काम-कोलारी गांव, तालुका-चिमूर,जिल्हा-चंद्रपूर:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण नियंत्रण ठेवल्यास हा उदयोग अत्यंत चांगला असेल. स्थानिकांना रोजगाराची संधि मिळाल्याने बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. प्रकल्प होण्यास आमची सहमती आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितलेकी कार्यरत प्रकल्पातून सांडपाणी हे बाहेर जात नाही. कारण ऊर्जा प्रकल्पात सांडपाणी निर्मिती होत नाही. प्रस्तावित प्रकल्प हा झेलएलडी प्रकल्प आहे. पाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर जाणार नाही. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही. |

१२) श्री शामसुंदर वाघ, मेंढेगांव (खापरी), तालुका-पवनी, जिल्हा-भंडारा:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती- दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी एक सूचना आहे की जो रस्ता भुयारहून कंपनीकडे मेढेंगावातून जो रस्ता आलेला आहे, तो रस्ता बाह्यवळण (Bye-Pass) करावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की बैठकीत अनेक स्थानिकांनी कार्यरत रस्त्याबाबत सूचना केल्या. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या भावनांचा आम्ही आदर करतो, त्यांचे म्हणणे १००% खरे आहे. मेढेंगावातून होणारी वाहतुक जेवढी कमी करता येईल, तेवढी ती कमी करण्यात येईल. भुयारहून मेंढेगावाच्या आधी एक बाह्यवळणाचे प्रयोजन आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु झालेले असून प्रस्तावित आसवणी प्रकल्प दोन वर्षात पुर्ण होत असताना रस्ताही पूर्ण होईल अशी आम्हांला आशा आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना वाहतुकीमुळे जी अडचण येते, ती राहणार नाही. |
| २) | त्याचप्रमाणे धुराचा त्रास प्रकल्पामुळे होतो, त्यावर कंपनीने नियंत्रण करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की<br>हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही. प्रस्तावित नवीन प्रकल्पात कार्यरत बॉयलरचा वापर प्रस्तावित प्रकल्पातही करणार आहोत. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्ने, आक्षेप यांना उत्तरे देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी विविध प्रश्नांवर उत्तरे दिली.

येथे ८.० मेगावॅटचा ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित आहे. या प्रकल्पातील ऊर्जा व वाफ ही नवीन प्रकल्पास देण्यात येईल. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांना प्रत्येक मुद्द्यावर उत्तर .

१) मानस एग्रोमध्ये युनिट नं. २ येथे ८६ व्यक्ती कार्यरत आहेत. त्यातील ७२ कर्मचारी हे भिवापूर, भुयार, कोलारी आणि शंकरपूर या आजूबाजूच्या गावातीलच आहे. म्हणजे प्रकल्पातील 80% रोजगार या परिसरातील गावांनाच मिळत आहे.

२) या कार्यरत प्रकल्पातून सांडपाणी हे बाहेर जात नाही. कारण ऊर्जा प्रकल्पात सांडपाणी निर्मिती होत नाही.

३) प्रस्तावित प्रकल्प हा झेलएलडी प्रकल्प आहे. पाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

४) हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ८० मीटर्सच्या चिमणीस अत्याधुनिक ईएसपी हे उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. मप्रनि मंडळाने १०० पीपीएम चे हवा प्रदूषणाचे मानक दिलेले असून प्रकल्पातून ५० पीपीएमपेक्षा जास्त धुर बाहेर जात नाही. त्यामुळे आपल्या प्रकल्पातून हवा प्रदूषण होत नाही.

५) प्रस्तावित नवीन प्रकल्पात कार्यरत बॉयलरचा वापर प्रस्तावित प्रकल्पातही करणार आहोत.

६) बैठकीत अनेक स्थानिकांनी कार्यरत रस्त्याबाबत सूचना केल्या. स्थानिकांनी उपस्थित केलेल्या भावनांचा आम्ही आदर करतो, त्यांचे म्हणणे १००% खरे आहे. मेंढेगावातून होणारी वाहतुक जेवढी कमी करता येईल, तेवढी ती कमी करण्यात येईल. भुयारहून मेंढेगावाच्या आधी एक बाह्यवळणाचे प्रयोजन आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु झालेले असून प्रस्तावित आसवणी प्रकल्प दोन वर्षात पुर्ण होत असताना रस्ताही पूर्ण होईल अशी आम्हांला आशा आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना वाहतुकीमुळे जी अडचण येते, ती राहणार नाही.

७) त्यांनी पूढे सांगितले सीएसआर निधी जी काही गुंतवणूक केली, ती पूर्ण कंपनी/ग्रुप म्हणून म्हणजे सहा युनिटची एकत्रित केलेली आहे. मात्र नवीन प्रकल्पात अंदाजे १४० लाखाची गुंतवणूक करणार आहोत. परिसरातील ग्रामपंचायतींशी आगाऊ चर्चा करुन योजना तयार करण्यात येतील. पहिल्या वर्षी ५० लाखांचा खर्च करण्यात येईल. गावातील शाळेतील वर्ग बांधून देणे, पुस्तके पुरविणे यासाठी ती रक्कम खर्च करण्यात येईल. दुस-या गावात आरोग्य सुविधा पुरविण्यात येतील. विविध गावांमधून विशिष्ट कालावधीनुसार आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येतील. डोळे तपासणी, चष्मे वाटप असे कार्यक्रम हाती घेण्यात येतील. परिसरातील गावात जेथे टॉयलेट ब्लॉक्सना पाणी पुरवठा नसेल, तेथे पाण्याची सुविधा पुरविण्यात येईल. जेथे पाण्याची सुविधा नाही, तेथे बोअरवेल देण्याचा आमची मानस आहे.

८) कोविड काळात औषधे, मास्क, सॅनिटायझर यांचे वाटप करण्यात आलेले आहे. हे सर्व प्रयोजन नवीन प्रकल्पाच्या अनुषंगाने करणार आहोत. सदरहू प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांना त्रास होऊ नये याची

आम्हांलाही काळजी आहे. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे आम्ही वायू, घनकचरा याबाबत योग्य प्रकारे नियोजन करणार आहोत. याबाबत स्थानिकांनी अजून काही सूचना केल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

९) आम्ही आश्वासन देतो की नवीन प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांना काहीही त्रास होणार नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प व्यवस्थापनाने उपस्थित केलेल्या सूचना,आक्षेपांना उत्तर दिलेली आहेत. त्यांनी अध्यक्षांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की आज आपण मे. मानस एग्रो इंडस्ट्रीज एण्ड इन्फ्रा स्ट्रकचर लिमिटेड, युनिट-२, सर्व्हे नं. १६५, १६८ व १६९, गाव कोलारी, तालुका-चिमूर, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन धान्यावर आधारित १९० किलो लिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी जमलो आहोत. सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही.

त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. सदरहू इतिवृत्ताची प्रत मागणी केल्यास स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०४ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)**<br>आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | **(अ. मा. करे)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | **(विशालकुमार मेश्राम)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |